# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

कॅम्प अमरावती ४४४ ६०२

☎ : ०७२१ - २६६२०२५/२६६२४९३ फॅक्स : २६६२८४३

Email : rdc.amravati@gmail.com Website : www.amravati.nic.in


क्र.अका/एमएजी/डे-२७/कावी/ ५९३ /२०१८ दिनांक :-२८/८/२०१८

**अंत्यतं महत्वाचे**

पर्यावरण विभाग
आ.क्र. 182
दिनांक 3/9/18

अमरावती महानगरपालिका
सा.प्र.विभाग
आ.क्र. 9276 दि. 30/8/18
विभागाचे नाव

प्रति,

१) उपविभागीय अधिकारी, अमरावती

२) तहसिलदार, अमरावती

पर्यावरण अधिकारी

विषय :- जनहित याचिका क्र १७३/२०१०

डॉ मेहेश बेडेकर वि.महाराष्ट्र शासन व इतर

(मंडप तपासणी संनियंत्रण समिती बाबत)

..............

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग मंत्रांलय, मुबंई परिपत्रक क्र न्यायाप्र २०१६/प्र.क्र.१२७/(भाग-१)नवि-१७ दि.६ मार्च २०१७ नुसार जनहित याचिका क्र १७३/२०१० संदर्भात मा उच्च्य न्यायालयाने दिनांक २४ जुन २०१५ व दिनांक १०,११,१२ व १६ ऑगष्ट २०१६ रोजी दिलेल्या आदेशा नुसार महानगर पाहिका क्षेत्रांमध्ये सार्वजनिक सण/उत्सव/समारंभ यासाठी उभारण्यात येणा-या मंडप /पेंडॉल तपासणी बाबत संबधित जिल्हाधिकारी यांच्या मार्फत तहससिलदार अथवा त्यावरील अधिका-याच्या गठित करण्यात आलेल्या मंडप तपासणी पथकामार्फत सार्वजनिक उत्सव/समारंभ सुरु होण्या पुर्वि पुरेशा कालावधी अगोदर मंडप/पेंडॉल तपासणी होणे. त्या संदर्भातील वस्तुनिष्ठ तपासणी अहवाल संबधित सक्षम प्राधिकारी यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी सादर करणे, इत्यादि कार्यवाही अधिक प्रभावितपणे होण्यासाठी महानगर पालिके करिता जिल्हाधिकारी यांनी महानगरपालिका निहाय मंडप/पेंडॉल तपासणी सनियंत्रण समिती/समित्या गठित करण्याचे आदेश दिलेले होते. त्यानुसार कार्यालयाचे पत्र क्र अका/एमएजी/डे-२७/कावि/४०८/२०१७ दिनांक २७/६/२०१७ अन्वये समिती स्थांपन करण्यात आली असुन शासन परिपत्रकात नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्या बाबत कळविण्यात आले होते.

करिता सन २०१८ मधील गणपती उत्सवामधील मंडप/पेंडॉल तपासणी करुन तपासणीची माहिती विहीत नमुन्यात या कार्यालयास सादर करावी. सदर माहिती फलनिष्पत्ती (KRA) मध्ये समाविष्ट आहे या बाबीची नोंद घ्यावी.

सहपत्र- वरिल प्रमाणे

स्वा/-

**(अभिजीत बांगर)**

**जिल्हादंडाधिकारी,अमरावती**

**प्रतिलीपी,**

**आयुक्त,**

महानगरपालीका, अमरावती यांना माहितीस्तव

28/08/18

**जिल्हादंडाधिकारी,अमरावती**

महाराष्ट्र शासन

न्यायालयीन प्रकरण

क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.१०/म-६,
महसुल व वन विभाग,
मुख्य इमारत, पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
Email: m6.revenue@maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र.०२२-२२०४८७०९
दिनांक: २४ जुलै, २०१७

27 FEB 2018

प्रति,

जिल्हाधिकारी,

मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, नाशिक, अहमदनगर, धुळे, जळगांव, पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, औरंगाबाद, नांदेड, लातूर, परभणी, नागपूर, चंद्रपूर, अमरावती, अकोला.

विषय: जनहित याचिका क्र.१७३/२०१०.
डॉ. महेश बेडेकर वि.महाराष्ट्र शासन व इतर.
(मंडप (पेंडॉल) तपासणीबाबत)

संदर्भ: या विभागाचे समक्रमांक दि.१/८/२०१६ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा.उच्च न्यायालयाने दि.१३.३.२०१५, दि.२४.६.२०१५ व दि.१०, ११, १२ व १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशाचे तसेच नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.न्यायाप्र २०१६/प्र.क्र.१२७/(भाग-१)/नवि-१७, दि.६ मार्च, २०१७ च्या शासन परिपत्रांचेही कृपया अवलोकन व्हावे.

२. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी उभारण्यात येत असलेल्या तात्पुरत्या मंडपांची तपासणी करण्यासाठी तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसुल अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्त करावी, असे आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे शासनाकडून वेळोवेळी आपणास सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आपल्या अधिपत्याखालील समित्या स्थापन करण्यात आल्या असून गतवर्षीप्रमाणे या वर्षीही संबंधित समितीने सार्वजनिक सण/उत्सव/समारंभ सुरु होण्यापूर्वी किमान ७ दिवस अगोदर तात्पुरत्या मंडपांची तपासणी करावी व त्याचा अहवाल

सण/उत्सव/समारंभ सुरु होण्यापूर्वी ३ दिवस अगोदर महानगरपालिकेस देणे क्रमप्राप्त आहे. त्याप्रमाणे आपल्या अधिपत्याखालील महानगरपालिका क्षेत्रातील संबंधित समितीने आगामी मुख्य उत्सव सुरु होण्यापूर्वी तसा अहवाल सोबत जोडलेल्या विवरणपत्रात महानगरपालिकेस विनाविलंब सादर करावा व त्याची एक प्रत शासनास सादर करावी, हि विनंती.

आपला,

(कि. पां. वडते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत: विवरणपत्र-१ व २

प्रत:-

सर्व विभागीय आयुक्त यांना विनंती करण्यात येते की, उक्त पत्राच्या अनुषंगाने त्यांच्या अधिनस्त जिल्हाधिकारी यांना आपल्या स्तरावरुन कृपया आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

विवरण पत्र क्रमांक २

मंडप तपासणी बाबतची माहिती

| अ.क्र. | महानगरपालीकेचे नाव | तपासधी पथक गठीत करण्यात आलेल्या आदेशाचा दिनांक (आदेशाची प्रत सोबत जोडावी) | पथकाचा तपशिल प्रसिध्द केलेल्या माध्यमाचे नाव (नोटीस बोर्ड/वेबसाईट/वर्तमानपत्र ई.)(प्रत सोबत जोडावी) | गठीत करण्यात आलेल्या पेंडाल तपासणी पथकाची संख्या | उत्सवाचे नाव दिनांक व कालावधी | तपासणी पथकाची एकुण भेटी दिलेल्या पेंडॉलची संख्या | पथकाने पेंडॉलला भेटी दिलेल्या तारखेचा तपशिल | तपासणीत आढळुन आलेल्या परवानगी शिवाय उभारण्यात आलेल्या तसेच शर्तभंग झालेल्या पेंडॉलची संख्या | रकाना क्र ९ संदर्भात तपशिल संक्षम प्राधिका-यास कळविल्याचा दिनांक | रकाना क्र ९ संदर्भात संक्षम प्राधिका-यां कडुन करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |